# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## येशूच्या अतिपवित्र हृदयाचा सण – ०७ जून २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः बंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना आपले पाळकीय कार्य प्रभावीपणे करण्यासाठी येशूच्या पवित्र हृदयाकडून कृपा व शक्ती मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या कुटुंबात, गावपरिवारात, धर्मग्रामात परमेश्वराच्या प्रेमाचे राज्य प्रस्थापित करण्यास येशूच्या अतिपवित्र हृदयाकडून आपणास प्रेरणा व सामर्थ्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. शिपायाने भोसकलेल्या भाल्यामुळे येशूच्या कुशीतून पाणी व रक्त बाहेर पडले आणि त्याच बरोबर सर्व मानवजातीसाठी दैवी दयेचा महासागर खुला झाला. या दयेच्या महासागतात प्रभूने आपल्याला डुबवून काढावे, आपल्या सर्व चिंता व समस्या दूर कराव्यात म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. येशूच्या अतिपवित्र हृदयाच्या सामर्थ्यशाली कृपेद्वारे दु:खितांचे सांत्वन व्हावे, दुर्बल मनाच्या लोकांना आधार मिळावा, शोकग्रस्तांना दिलासा प्राप्त व्हावा, जगात सर्वत्र शांती नांदावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. प्रभू येशूच्या हृदयाची मनोभावे भक्ती व आराधना करणा-या आपणा सर्वांवर परमेश्वराचा भरपूर आशीर्वाद असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.